महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 3544/5/26 दिनांक : 19.05.2026

प्रति,

मा. जिल्हाधिकारी
चंद्रपूर

सप्रेम नमस्कार,

विषय : बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील सर्व कृषी केंद्रांमध्ये युरिया व DAP खत तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत.

महोदय,

श्री. बंडू गौरकार, जिल्हा अध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त निवेदन सोबत जोडले आहे. सध्या खरीप हंगाम सुरू असून शेतकऱ्यांना युरिया व DAP खतांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासत आहे.

मूल तालुक्यातील 32 कृषी केंद्रांपैकी 25 केंद्रांमध्ये युरिया तर फक्त 9 केंद्रांमध्ये DAP उपलब्ध आहे. बल्लारपूर तालुक्यातील 15 कृषी केंद्रांपैकी 9 केंद्रांमध्ये युरिया व 7 केंद्रांमध्ये DAP उपलब्ध आहे.

पोंभुर्णा तालुक्यातील 37 कृषी केंद्रांपैकी 26 केंद्रांमध्ये युरिया तर केवळ 9 केंद्रांमध्ये DAP उपलब्ध आहे. तसेच चंद्रपूर तालुक्यातील 65 कृषी केंद्रांपैकी 39 केंद्रांमध्ये युरिया व 19 केंद्रांमध्ये DAP उपलब्ध आहे.

मात्र बल्लारपूर व चंद्रपूर तालुक्यातील अनेक कृषी केंद्रांमध्ये खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी बांधवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बल्लारपूर तालुक्यातील अनेक कृषी केंद्रांमध्ये युरिया उपलब्ध असले तरी DAP खत अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहे. तसेच काही केंद्रांमध्ये दोन्ही खतांचा तुटवडा जाणवत आहे. परिणामी शेतकऱ्यांना विविध कृषी केंद्रांवर फेऱ्या माराव्या लागत असून त्यांचा वेळ व आर्थिक खर्च वाढत आहे.



।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।।
पत्ता :'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र.07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।।

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

ग्रामीण भागातील अनेक शेतकरी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेतीच्या कामांमध्ये व्यस्त आहेत. अशा परिस्थितीत खत उपलब्ध नसल्यामुळे पेरणी व पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारीही प्राप्त होत आहेत.

तरी आपण संबंधित विभागास निर्देश देऊन बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील सर्व कृषी केंद्रांमध्ये युरिया व DAP खताचा पुरेसा साठा तात्काळ उपलब्ध करून द्यावा. तसेच खताचा काळाबाजार व कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी केली आहे. त्याअनुषंगाने तपासून याबाबत आपल्या स्तरावरून नियमानुसार योग्य कार्यवाही करावी, ही विनंती.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

1 मा. कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर

2 श्री. बंडू गौरकार, जिल्हा अध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा, चंद्रपूर
कार्या. डीआरसी कॉलनी नं. 3, क्वॉटर नं. एमझेड 63, डब्ल्युसीएल वर्कशॉप जवळ, बल्लारपूर रोड, चंद्रपूर जि. चंद्रपूर मो.नं.9145405667